दैनिक

# पुण्यनगरी

दि. २६ ऑगस्ट, २०२४

# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी साधला लखपती दीदींशी संवाद



**जळगाव** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी जळगाव येथे देशातील निवडक लखपती दीदींशी संवाद साधला. लखपती दीदी योजनेमुळे त्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलाविषयी त्यांनी संवादाच्या माध्यमातून जाणून घेतले. 'लखपती दीदी योजनेमुळे महिला बचतगटांना मिळालेल्या आर्थिक, व्यावसायिक सहाय्य व प्रशिक्षणामुळे आम्ही आर्थिकदृष्ट्या सक्षम झालो. त्याचबरोबर आम्हाला आत्मसन्मानही मिळाला, अशी भावना लखपती दीदींनी यावेळी व्यक्त केली.

येथील प्राइम इंडस्ट्रियल पार्क मैदानावर झालेल्या लखपती दीदी संमेलनापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील निवडक अशा ८० लखपती दीदींशी संवाद साधला. या लखपती दीदी संवाद ▸▸ पान ७ वर

दैनिक

**पुण्यनगरी** **दि. २६ ऑगस्ट, २०२४**

पुण्य नगरी

# महिला अत्याचार अक्षम्य पाप, निष्काळजीपणा खपवून घेणार नाही

## लखपती दीदींच्या मेळाव्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इशारा





**। जळगाव :** महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणात आपण निष्काळजीपणा खपवून घेणार नाही. देशातील कोणत्याही राज्यात असो, महिलांविरुद्ध होत असलेला अत्याचार हे अक्षम्य पाप आहे, दोषींना फाशी झालीच पाहिजे, त्यांना मदत करणारे, पाठीशी घालणारे सुटता कामा नयेत. रुग्णालय, शाळा, कार्यालय अथवा पोलीस प्रशासन ज्या पातळीवर कामात निष्काळजीपणा होत असेल तर त्यांचा हिशोब चुकता व्हायला हवा, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला.

जळगाव येथे लखपती दीदी संमेलनाचे रविवारी दुपारी १२ वाजता विमानतळ परिसरात आयोजन करण्यात आले होते. यावेळी दीड लाख महिलांच्या उपस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बदलापूर, कोलकाता येथे झालेल्या महिला अत्याचाराच्या घटनांबाबत चिंता व्यक्त करत महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना व पाठीशी घालणाऱ्यांना कडक इशारा दिला. लखपती दीदी संमेलनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्ण, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान, दूरसंचार मंत्री डॉक्टर पेम्मास्वामी चंद्रशेखर, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आदी उपस्थिती होती.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, देशातील महिला अर्थव्यवस्थेत मोलाची भूमिका बजावत आहेत. दुसरीकडे संरक्षण दलातदेखील त्यांचे प्रमाण आपण वाढवत आहोत. देशात महिलांचे सामर्थ्य वाढवण्याबरोबरच त्यांना सुरक्षा पुरवणे, हे आपले दायित्व आहे. महिलांच्या वेदना व राग मला समजत आहे. सत्ता कुणाचीही असो, सत्ता ही येत असते आणि जात असते. मात्र, अत्याचाराच्या घटनांबाबत देशातील प्रत्येक राज्य सरकारने दोषी कुणीही असला तरी त्याला पाठीशी घालता कामा नये. नारीची रक्षा हे सगळ्यात मोठे दायित्व आहे. त्यामुळे अत्याचाराविरुद्धचे कायदे आम्ही कडक केले आहेत. पूर्वी एफआयआर दाखल करायलादेखील वेळ लागत होता. आता न्यायसंहिता बदलवून पीडित महिला ई-एफआयआर नोंदवू शकते. कुणालाही यात छेडछाड करता येणार नाही.

नवीन कायद्याबाबत बोलताना मोदी म्हणाले की, अत्याचार करणाऱ्याला आता फाशी व जन्मठेप होईल, असे कायदे आणले असून लग्नाच्या नावाखाली फसवणूक होत असेल तर सात वर्षांची शिक्षेची तरतूद केली आहे. त्यामुळे अत्याचाराच्या घटनांना पाठीशी घालू नका, असा इशारा देखील त्यांनी दिला.

### विकसित भारतात महाराष्ट्र चमकणारा तारा

भारत आगामी काळात तिसरी मोठी अर्थव्यवस्था असलेला देश बनू पाहत आहे. देशाच्या प्रगतीत आजवर महाराष्ट्राचे मोठे योगदान राहिले आहे. विकसित भारतात महाराष्ट्र हा चमकणारा तारा असल्याचा गौरव नरेंद्र मोदींनी केला. महाराष्ट्र हा गुंतवणूकदारांसाठी आकर्षणाचे केंद्र असून भविष्यात जास्तीत जास्त नोकरीच्या संधी निर्माण होणार आहेत. महायुतीचे सरकार हीच गुंतवणुकीची गॅरंटी असल्याचे सांगत महाराष्ट्र महायुतीलाच साथ देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### १० वर्षातील कामे तराजूमध्ये मोजा

पंतप्रधानांनी स्वातंत्र्यापासून २०१४ पर्यंतची व आमच्या १० वर्षांच्या काळाची कामे तराजूत मोजा, असे आव्हान दिले. महिला व मुली यांना आर्थिक बळ देण्यासाठी २०१४ च्या पूर्वी २५ हजार कोटी रुपये बँक कर्ज सखी मंडळांना देण्यात आले. मात्र, भाजप सरकारच्या दहा वर्षांच्या काळात ९ लाख कोटींची मदत सखी मंडळांना करण्यात आलेली आहे.

दैनिक

पुण्यनगरी

दि. २६ ऑगस्ट, २०२४



पुण्य नगरी

# जगभरात महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन अनुभवले

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गौरवोद्गार

नेपाळ अपघातातील मयत भाविकांना मदत देणार

## महिलांना ३ कोटी घरे देणार

## देशात २ लाख महिला ड्रोन पायलट होणार

## महिलांची अलोट गर्दी, दोन तास चक्का जाम

# बस शोधण्यासाठी महिलांना भरपावसात करावी लागली कसरत

सभा संपल्यानंतर महामार्गावर वाहतुकीची कोंडी

## चिखलावरुन पाय घसरल्याने तरुण गंभीर जखमी

दैनिक

# पुण्यनगरी

दि. २६ ऑगस्ट, २०२४

# पुण्य नगरी





# नार-पार योजनेची लवकरच निघणार निविदा

## लखपती दीदींच्या संमेलनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा









### योजनेत महाराष्ट्राचा मोठा वाटा असेल : एकनाथ शिंदे

### महिलांना आर्थिक सक्षम करणारी योजना : शिवराजसिंह चौहान

### राज्यात ५० लाख महिलांना लखपती बनविण्याचा संकल्प

### पंतप्रधानांचे मराठीतून भाषण

### नेपाळ अपघातातील मयतांच्या वारसांना ५ लाखांची मदत जाहीर

### दीड किलोमिटर पायपीट, पावसामुळे हाल



### उघड्या जीपमधून मोदींचे भगिनींना अभिवादन